शासकीय संशोधन अधिछात्रवृत्ती आर्थिक सहाय्य योजना (ऑफलाईन पध्दतीने).

| अ. क्र. | योजना | सविस्तर माहिती |
|---|---|---|
| १ | योजनेचे नांव | **शासकीय संशोधन अधिछात्रवृत्ती** |
| २ | योजने बद्दलचा शासन निर्णय | शासन निर्णय एससीएच/१०८२/४१९९ विशि-३, दि. १३/०८/१९८५ अन्वये सुरु करण्यात आलेली आहे. |
| ३ | योजनेचा प्रकार/स्वरुप | राज्यातील विद्यापीठीय व महाविद्यालयीन स्तरावीरल विद्यार्थ्यांना त्यांच्या विषयामध्ये पी. एच्. डी. करता यावी, या उद्देशाने ही योजना सुरु करण्यात आलेली आहे. |
| ४ | योजनेचा उद्देश | राज्यातील विद्यार्थ्यांना पी. एच्. डी. पुर्ण करता यावी. |
| ५ | योजना ज्या प्रवर्गासाठी लागू आहे त्याचे नाव | सर्व संवर्गातील विद्यार्थ्यांसाठी. |
| ६ | योजनेच्या प्रमुख अटी | १. शिक्षण संचालकांच्या स्तरावर गठित केलेल्या समितीमार्फत प्राप्त आवेदनपत्रांची छाननी करुन गुणवत्तेनुसार विहित तीन संचांची निवड केली जाते.<br>२. महाविद्यालयीन स्तरावर प्राचार्यांनी गठित केलेल्या समितीमार्फत पदवी / पदव्युत्तर अभ्यासक्रम व इतर संशोधनपर रेकॉर्ड पाहून त्यांना विहित केलेल्या संचास अधिन राहून प्राचार्यांकडून निवड केली जाते.<br>३. या शिष्यवृत्तीसाठी उत्पन्न मर्यादा नाही.<br>४.संबंधित छात्र कोठेही सेवेत नसावा. तसेच त्यांनी इतर कोणतीही शिष्यवृत्ती घेतलेली नसावी.<br>५. संबंधित विद्यार्थ्याने पी. एच्. डी. संबंधी विद्यापीठामध्ये रीतसर नोंदणी करुन संबंधित मार्गदर्शकाने शिफारस करणे आवश्यक आहे.<br>६. महाविद्यालयीन स्तरांवर पदव्युत्तर अभ्यासक्रम व इतर संशोधनपर रेकॉर्ड पाहून विहीत केलेल्या संचाच्या अधीन राहून प्राचार्यांमार्फत निवड केली जाते.<br>७.विद्यार्थी हा महाराष्ट्राचा रहिवासी असणे आवश्यक आहे.<br>८.सदर शिष्यवृत्ती चे राज्य स्तर ३ व महाविद्यालयीन ११ संच आहेत. |
| ७ | आवश्यक कागदपत्रे | १. विहित नमुन्यातील आवश्यकती कागदपत्रे<br>२. बँक खाते पासबुकच्या प्रथम पानाची छायांकित प्रत.<br>३. अधिछात्राची त्याच्या मार्गदर्शकामार्फत त्याचा वार्षीक प्रगती अहवाल सादर करणे आवश्यक. |
| ८ | दिल्या जाणाया लाभाचे स्वरुप | पी. एच्. डी प्रतिवर्ष- ९०००/- व रु १००० सादीलवार खर्च रक्कम ही भारतीय स्टेट बँक ऑफ ईडिया पुणे कोषागार शाखा,पुणे यांचामार्फत विद्यार्थ्यांचे बँक खातेवर थेट (NFT) जमा करण्यात येते. |
| ९ | अर्ज करण्याची पध्दत | नवीनमंजूरी/नुतनिकरणसाठी ऑफलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. ज्या विद्यार्थ्यांस नवीन (Fresh) शिष्यवृत्ती मंजूर झालेली आहे असे विद्यार्थी पुढील वर्षाचे अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेनंतर नुतनीकरणाचा अर्ज सद्यस्थितीत ऑफलाईन पध्दतीने महाविद्यालयामार्फत संचालनालयास सादर करणे आवश्यक आहे. |
| १० | अंदाजे प्रक्रियेला लागणारा वेळ | अर्ज स्विकारण्याची प्रक्रिया साधारणपणे माहे ऑगस्ट ते मार्च पर्यंत असते. सदर अर्जाची विविध स्तरांवरील छाननी होऊन शिष्यवृत्तीची रक्कम माहे एप्रिल मध्ये विद्यार्थ्यांना थेट त्यांचे खातेवर वितरीत होते.<br>(कालावधी : ऑगस्ट ते मार्च – ८ ते १० महिने) |
| ११ | संपर्क कार्यालयाचे नाव व पत्ता | उच्च शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती इमारत, ससून सर्वोपचार रुग्णालयाजवळ, पुणे स्टेशन, पुणे -४११ ००१. |

| | | |
|---|---|---|
| १२ | ऑनलाईन अर्ज करण्याचे संकेतस्थळ | ऑफलाईन पध्दतीने. |